

'जवा हे मोहब्बत हसी है जमाना...', 'आवाज दे कहाँ है...' आणि 'आहे ना भरे शिकवे न कीये...' या निवडक गाण्याद्वारे हसी जमान्याला आवाज देऊन घायाळ करणारी गायिका नूजरहाँ आपल्यामधून शिकवा न करता निघून गेली. त्याचे स्मरण...

□ अजित पोपट

मलिका-ए-तरन्नूम नूरजहाँ कॅन्सर पेशंट होत्या. या पवित्र रमजानच्या महिन्यात त्यांच्या हृदयाने मात्र त्यांना दगा दिला. शनिवार २३ डिसेंबर रोजी त्यांचे त्यांच्या मूळ गावी इंतकाल झाले.

आपल्या येथे फक्त बारा चित्रपट करणारी गायिका-अभिनेत्री नूरजहाँने आवाज आणि सौंदर्याने करोडो चित्रपट रसिकांना घायाळ केले होते. बारा चित्रपटातील त्यांनी सगळीच गाणी गायली असं समजल्यास जास्तीत जास्त शंभर-सव्वाशे गाणी जमतील. बोटावर मोजता येतील इतक्या गीताद्वारे नूरजहाँने दुनियाभरातील संगीतरसिकांच्या हृदयावर राज्य केले. त्याचबरोबर संगीत आणि स्त्री स्वातंत्र्य यासाठी त्या पाकिस्तानमधील धर्मांध मुल्लांबरोबर लढा देत होत्या. 'इस्लाम में गाना बजाना हराम है' असं म्हणणाऱ्या मुल्लांना त्यांनी संगीत ही मेरी इबादत (भक्ती) है हे ठासून सांगितलं.

नूरजहाँचा जन्म २१ मे १९२५ साली अखंड हिंदुस्तानच्या पंजाबमधील लाहोर नजीकच्या कौसूर गावी झाला. लहान वयातच त्यांच्या गळ्यामध्ये स्वर माधुर्य होते. बेगम अख्तर त्याकाळी अख्तरीबाई फैजाबादी या नावाने ओळखल्या जात होत्या. मशहूर उर्दू नाट्यकार

मलिका-ए-तरन्नूम नूरजहाँ



छाया: विपिन कोटक



दिलीपकुमारबरोबर नूरजहाँ



प्राण आणि नूरजहाँ

आगा हश्र काश्मिरी यांच्याकडील एका समारंभाला सहा वर्षाच्या बेबी नूरजहाँने बेगम अख्तर यांची गजल छेडली. 'दिवाना बना है तो दिवाना बना दे...' या लहानगीच्या या गाण्याने उपस्थित सगळेच दिवाने झाले. आगा हश्र काश्मिरींच्या पत्नी मुख्तार बेगम यांनी नूरजहाँच्या आईवडिलांना देवाने दिलेल्या या कंठात लाखो लोकांना दिवाना बनवायची ताकत असल्याचे तसेच संगीताची थोडी तालीम देऊन या हिऱ्याला कस काढायला सांगितले.

पंजाब पटियाला घराण्याचे उस्ताद गुलाम महंमद खाँ यांच्याजवळ नूरजहाँची तालीम सुरू झाली. सात्त्विक खुराग आणि कलेचा एकधारी रियाज थोड्याच महिन्यात रंग दाखवू लागला. हिंदी चित्रपटाचे प्रसिद्ध खलनायक प्राण आणि संगीतकार ओ. पी. नय्यर या कलारत्नांना पारखणाऱ्या पांचोली फिल्मच्या मालकांची नजर या प्रतिभावान लहान मुलीवर पडली. लहान वय, मोठी अंगकाठी, मादक सौंदर्य आणि कसलेला कंठ असलेल्या या मुलीला दलसुख पांचोली यांनी *खानदान* चित्रपटात प्रवेश दिला. संगीतकार गुलाम हैदर यांनी या मुलीकडून दोन गीतं गाऊन घेतली: 'तू कौनसी बदली है मेरे चांद है आज...' आणि 'मेरे लिए जहाँ से कह देना करार है...' रात्रीभरात देशाच्या कोपऱ्याकोपऱ्यात हे गीत वाजू लागले.

नूरजहाँच्या कंठात मधुरतेबरोबर बुलंदी, लोकगीत तसेच ठुमरी-दादरासारखे उपशास्त्रीय गीत गाताना अचूक शब्दावर जोर टाकून गायची एक अनोखी खुबी होती. मोकळ्या आवाजाने गाणाऱ्या विशेषतेबरोबर त्यांचं व्यक्तिमत्त्व मोकळं आणि प्रेमळ होतं. पांचोली फिल्ममध्ये काम करता-करता कंपनीचे संचालक शौकत हुसेन रिजवींच्या प्रेमात पडून त्यांनी लग्न केलं. आणि नशीब आजमवायला मुंबईची वाट धरली. येथे *दोस्त*, *बडी माँ* आणि *झीनत*सारखे चित्रपट त्यांनी केले.

के. दत्ता ऊर्फ दत्ता कोरगांवकर या संगीतकारांनी खास नूहजहाँसाठी तर्ज तयार केल्या. *बडी माँ*मधील गीतं आजही नूरजहाँच्या आवाजात अमर आहेत : 'दिया जलाकार आप बुझाया...' आणि 'आ इंतजार है तेरा...' आणखीन दोन गाणी 'किसी तरह से मोहब्बत में चैन पा न सके...' तसेच 'तुम हमको भुला बैठे हो...' ही गाणी ऐकून कुणीही मुग्ध व्हावे. त्यात नूरजहाँ 'पा ना सके' या शब्दावर ज्याप्रकारे वजन द्यायची ते ऐकून भल्याभल्यांच्या काळजाचा ठोका चुकायचा.

मुंबईमध्ये नूरजहाँला खरा ब्रेक दिला तो मेहबूब खान यांनी. नुकताच त्यांचा बांद्रा येथील स्टुडिओ आगीत भस्मसात झाला. मेहबूब खान यांचा *अनमोल घडी* हा चित्रपट नूरजहाँच्या कारकीर्दीतील सर्वोच्च बिंदू म्हणून गणला जातो. या चित्रपटात तीन सोलो आणि एक ड्युएट ही गाणी आजही यादगार आहेत. या चित्रपटावर बोलताना नौशाद यांच्या डोळ्यात चमक येते. ते सांगतात, 'वो सुनने वालोंको और देखनेवालों को दिवाना बना देती थी'. आम्ही 'जवा है मोहब्बत हसी है जमाना...' या गाण्याची रिहर्सल करत होतो. पंचवीस-तीस वेळा रिहर्सल केली. गायन आणि पार्श्वसंगीत सगळं परफेक्ट होतं. तरीसुद्धा आम्ही रिहर्सल करत गेलो कारण या बहाण्याने नूरजहाँला सतत ऐकायची आणि पाहायची संधी मिळत होती. आम्ही सतत त्यांच्याकडून रिहर्सल करवत गेलो आणि बाई मजेने गात गेल्या.

असाच एक मजेदार किस्सा त्यांनी गायलेल्या 'आवाज दे कहाँ है...' या गीताबद्दल ऐकायला मिळतो. सैगलला पूरक म्हणून गायक-अभिनेता म्हणून सुरेंद्रनाथने हे गीत नूरजहाँबरोबर गायले. मजा [illegible] आहे की नूरजहाँला गाताना पाहून सुरेंद्र स्वतःच्या ओळी विसरून जायचा शेवटी नौशाद यांनी नूरजहाँचा चेहराच दिसणार नाही अशी व्यवस्था केली. नूरजहाँसमोर कमी लेखलं जाऊ नये म्हणून सुरेंद्रने तन्मयतेने ते गीत पूर्ण केले. जे आजही सदाबहार म्हणून गणले जाते. *अनमोल घडी*त त्यांनी गायलेले यादगार सोलो गाणं – 'मेरे बचपन के साथी मुझे भुला न जाना...' आणि 'क्या मिल गया भगवान मेरे दिल को दुखाके...'

१९८२ साली हिंदी चित्रपटसृष्टी आणि पार्श्वगायनाचा अमृतमहोत्सव षण्मुखानंद हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. तेव्हा नूरजहाँने 'आवाज दे कहाँ है...' हे गीत गायलं. त्या मुंबईत येऊन गाणार नाहीत या अटीवर पाकिस्तान सरकारने त्यांना मुंबईत येण्याची परवानगी दिली. परंतु नूरजहाँ गायली.

नूरजहाँच्या यादगार गीतांची बात करता *दोस्त* आणि *जुगनू* चित्रपटाची याद न करता चालणार नाही. *दोस्त*चे संगीतकार होते सज्जाद हुसेन मिरचीपेक्षाही तिखट स्वभाव म्हणून प्रसिद्ध असलेले सज्जाद यांनी *दोस्त*साठी श्रवणीय संगीत दिले. त्यात 'बदनाम मोहब्बत कौन करे...' या गीताने धुम माजवली होती आणि येथेच दोन कलाकारांमध्ये क्लेशाची ठिणगी पडली. शौकत हुसेनने [illegible]रपण *दोस्त*ची गाणी नूरजहाँमुळे हिट झाल्याचे म्हटले. आणि सज्जाद चिडले. त्यांनी नूरजहाँबरोबरचे इतर दोन चित्रपट सोडले. त्यानंतर नुकसान मात्र सज्जादचे झाले. नूरजहाँचे नव्हे.

सज्जादने सोडलेले दोन चित्रपट म्हणजे *झीनत* आणि *जुगनू*. *झीनत*मध्ये मीरसाहेब हफीज खान आणि रफीक गजनवी यांचे संगीत-दिग्दर्शन हीट सिद्ध झाले. *झीनत*द्वारेच चित्रपटात कव्वालीचा ट्रेन्ड सुरू झाला. *झीनत*ची प्रसिद्ध कव्वाली होती: 'आहे ना भरे शिकवे न कीये...' *जुगनू* हा चित्रपट सर्वांगीणरित्या महत्त्वाचा चित्रपट होता. या चित्रपटाने शौकत हुसेन यांना एका वेगळ्याच कारणाने प्रसिद्धी दिली. या चित्रपटाचा नायक दिलीपकुमार होते. शौकत यांना भीती होती की नूरजहाँ दिलीपच्या प्रेमात पडेल आणि घडलेसुद्धा तसेच. त्याचदरम्यान



दोन सूर - लता मंगेशकरबरोबर नूरजहाँ



▲ सुरैया, प्राण आणि नूरजहाँ

अनमोल घडी नूरजहाँ आणि सुरैया ▼



देशविभागणीने नूरजहाँ आणि शौकत पाकिस्तानात निघून गेले. *जुगनू*मध्ये फिरोज निझामी यांनी संगीतबद्ध केलेली सगळी गाणी नूरजहाँने गायली : 'उमंगे दिलसे मचली...', 'आज की रात...', 'हमे तो शामे गम में काटनी है जिंदगी अपनी...', 'तुम भी भुला दो मैं भी भुला दू...' याचे यश फिरोज निझामी यांना मिळाले.

येथे महत्त्वाचा मुद्दा म्हणजे १९३९-४०मध्ये चित्रपट *गाजी सलाउद्दीन* या चित्रपटासाठी नौशाद यांचे गुरू खेमचंद प्रकाश यांनी संगीत दिलं होतं. चित्रपट पडल्याने संगीत विस्मरणात गेले. परंतु *गाजी सलाउद्दीन*साठी कल्याणी नावाच्या गायिका-अभिनेत्रीसाठी खेमचंद प्रकाश यांनी तयार केलेली तर्ज फिरोज निझामी यांनी *जुगनू*साठी तशीच्या तशी वापरली. आणि त्याचे संगीत सुपरहिट झाले. या गोष्टीचे दोन साक्षीदार दिलीपकुमार आणि नौशाद आजही आपल्यात आहेत. त्यांना विचारा पाहिजे तर

*जुगनू*साठी आणखीन एक गोष्ट म्हणजे *जुगनू*मध्ये मुकेश तलत मेहमूद आणि किशोरकुमार या गायकांना अमर गायक अभिनेता सहगल आणि नूरजहाँबरोबर गायची संधी मिळाली नव्हती. ती संधी महंमद रफीला मिळाली. रफीने *शहाजहाँन*मध्ये सैगल बरोबर गायलेलं गीत हीट नाही झालं तरी *जुगनू*मध्ये दिलीपकुमारसाठी नूरजहाँबरोबर गायलेलं गीत सुपर हीट आहे : 'यहा बदला वफा का बेवफाई के सिवा क्या है...'

१९४७ साली देशाच्या स्वातंत्र्यानंतर शौकत हुसेनने पाकिस्तानमध्ये स्थायिक व्हायचा हट्ट धरला. नूरजहाँ निघून गेली. पण या मियाबीबींना पाकिस्तानात करमले नाही. पाकिस्तानात स्थायिक झाल्यावर पस्तीस वर्षाच्या त्यांच्या फिल्म कारकीर्दीत नूरजहाँला चार ते पाच लक्षात राहण्याजोगी गाणी मिळाली. त्यांनी जेव्हा जेव्हा पत्रकार किंवा टीव्हीला मुलाखत दिली तेव्हा त्या या पाच गीतांचा आवर्जून उल्लेख करत : 'अब कहा कोई नहीं...', 'पत्ता पत्ता बुटा बुटा...' आणि 'मुझसे पहले सी मोहब्बत मेरे मेहबूब न मांग...' मुंबई सोडून पाकिस्तानात स्थायिक झालेले दिग्दर्शक ए. आर. कारदार पाकिस्तानात चित्रपट निर्मितीसाठी अनुकूल वातावरण नाही. हे पाहून मुंबईला परतले. ही हिम्मत नूरजहाँ मात्र दाखवू शकली नाही. शौकत हुसेन पासून तलाक घेतल्यावर संगीतकार नजर हुसेन आणि फिल्मस्टार एजाज दुरानीबरोबर त्यांनी लग्न केल्याची बातमी पसरली. क्रिकेटर फजल अली आणि त्याकाळी पाकिस्तानचे राष्ट्रप्रमुख असलेले खान यांच्याबरोबर त्यांच्या विशेष मैत्रीच्या अफवासुद्धा उडत होत्या.

पाकिस्तानमध्ये नूरजहाँला अनेक कटू अनुभव येऊ लागले. गेल्या काही वर्षांत लहानसहान गोष्टीवर त्या क्रोधीत होतं, अशी वर्तमानपत्रात बातमी छापून येऊ लागली. नूरजहाँच्या जाण्याने लताच्या कारकीर्दीला सहाजिकच गती मिळाली. दोघांदरम्यान बरीच चांगली मैत्री होती. हल्लीपर्यंत दोघी फोनवर तासन् तास गप्पा मारत. एक-दोनदा तर त्यांची भारत-पाक सरहद्दीजवळ भेटसुद्धा घडली होती.

आज ऐकून थोडं आश्चर्य वाटेल की खलनायक म्हणून प्रसिद्ध असलेले प्राण यांचा पहिला चित्रपट *यमला जट* (पंजाबी) या चित्रपटात नूरजहाँ त्यांची सहअभिनेत्री होती. पाकिस्तानी वृत्तपत्रांचा रिपोर्ट खरा मानला तर नूरजहाँने पंजाबी, हिंदी, उर्दू चित्रपट गीतं आणि गैरफिल्मी गीतं मिळून वीस हजार गीतं गायली आहेत.

बालकलाकार म्हणून नूरजहाँने १९३५ साली *मिस्त्र का सितारा* या चित्रपटात पहिल्यांदा काम केलं. अभिनेत्री झाल्यावर, नूरजहाँने त्याकाळच्या प्रसिद्ध संगीतकारांसाठी गायन केले. त्यात रफीक गजनवी (*दुहाई, नोकर*), के. दत्ता (*नादान, बडी माँ*), शामसुंदर (*भाइजान, गाव की गोरी*), नौशाद (*अनमोल घडी*), फिरोज निजमी (*जुगनू*) यांचा समावेश होता. *दुहाई*मध्ये रफीक गजनवी बरोबर बासरीवादक पन्नालाल घोषसुद्धा संगीतकार म्हणून होते.

स्वदेशी परतल्यावर या दाम्पत्याने लाहोरमध्ये शाहनूर स्टुडियो स्थापला तेथे काही चित्रपट केले. १९५९ साली वजन वाढल्याच्या कारणाने नूरजहाँने अभिनय सोडला. आणि १९८९साली आलेल्या हार्ट अॅटॅकने गायचंसुद्धा बंद केलं.

लिटील मास्टर सुनील गावस्करने 'सनी डेज' या आत्मकथेत एक घटना चितारली आहे. एका समारंभात नूरजहाँबरोबर सनीचा इंटरनॅशनल क्रिकेटर म्हणून परिचय करवून देण्यात आला त्यावर नूरजहाँ उत्तरली मी तर फक्त इमरान खान या एकाच क्रिकेटरला ओळखते. परिचय करवून देणाऱ्याचा चेहरा पडला. त्यावर त्याला डोळ्याने सनीने धैर्य धरण्याचा इशारा केला. नूरजहाँची ओळख करून देताना त्या परिचयकाराने ही मल्लिका-ए-तरन्नूम नूरजहाँ म्हणून सांगितले त्यावर सनीने मी एकाच मलिका-ए-तरन्नूमला ओळखतो तिचं नाव लता मंगेशकर असल्याचे बोलून टोला हाणला. ●